
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 MAY 2025
सकाळ



कोल्हापूर : डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या जयंतीनिमित्त उपस्थित मान्यवर.

# डॉ. आप्पासाहेब पवार यांची शिवाजी विद्यापीठात जयंती साजरी

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांची जयंती विद्यापीठात साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सी. एच. भोसले, डॉ. सी. एच. पवार, डॉ. तानाजी चौगले, डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी भवनचे रेक्टर डॉ. दीपक भादले, डॉ. मीना पोतदार, डी. बी. साबळे, डॉ. माधुरी वाळवेकर, पवन कांबळे, श्रुतिका निकाळजे, विद्यार्थी भवनचे आजी-माजी विद्यार्थी आणि प्रशासकीय सेवक, अधिकारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 MAY 2025
सकाळ

# बी. एस्सी. नॅनो सायन्स, तंत्रज्ञान अभ्यासक्रमासाठी संधी

## १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन



कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागात विद्यार्थ्यांना बी.एस्सी. नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध असून, बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी केले आहे.

ज्या विद्यार्थ्यांना बुद्धीला चालना देऊन शास्त्र व तंत्रज्ञान (सायन्स अँड टेक्नॉलॉजी) यात आव्हानात्मक करिअर करायचे आहे, अशा विद्यार्थ्यांसाठी 'नॅनो सायन्स व नॅनो टेक्नॉलॉजी'च्या माध्यमातून संधी उपलब्ध आहे. या नावीन्यपूर्ण व प्रगतिशील क्षेत्रांमध्ये करिअर घडवण्यासाठीचे आवश्यक शिक्षण हे विज्ञान शाखेतून बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर करता येऊ शकते. त्यामध्ये बॅचलर ऑफ सायन्स (B.Sc.), मास्टर्स ऑफ सायन्स (M.Sc.), B.Sc.-M.Sc. इंटिग्रेटेड, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी (B.Tech) अभ्यासक्रम देशातील निवडक विद्यापीठांत उपलब्ध आहेत. पुढील पीएच. डी. पर्यंतचे शिक्षण आणि पोस्ट डॉक्टरल फेलोशिप व संशोधनासाठी भारत व भारताबाहेर संधी आहेत. संबंधित अभ्यासक्रम शिवाजी विद्यापीठ येथे उपलब्ध असून, स्कूल ऑफ नॅनोसायन्स व नॅनोटेक्नोलॉजी अधिविभागामध्ये बी.एस्सी., एम.एस्सी. नॅनो सायन्स व नॅनो टेक्नोलॉजी (इंटिग्रेटेड) प्रोग्रॅमसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. बी. एस्सी. रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र उत्तीर्ण विद्यार्थी एम-एस्सी नॅनो सायन्स व नॅनो-टेक्नोलॉजीसाठी प्रवेश घेऊ शकतात.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 MAY 2025
लोकमत

# 'नॅनोसायन्स व टेक्नॉलॉजी'साठी प्रवेशाला सुरुवात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी या विभागात विद्यार्थ्यांना बी.एस्सी. - नॅनोसायन्स व तंत्रज्ञान अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध असून, बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी केले आहे.

बी.एस्सी. रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र उत्तीर्ण विद्यार्थी एम.एस्सी. नॅनोसायन्स व नॅनोटेक्नॉलॉजीसाठी प्रवेश घेऊ शकतात. आजपर्यंत या अधिविभागातून अनेक विद्यार्थ्यांनी पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले असून, ते संशोधन, उद्योजकता तसेच शासकीय व खासगी कंपन्यांमध्ये यशस्वीपणे कार्यरत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 MAY 2025
पुढारी

# राजर्षी शाहू महाराजांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. राजर्षी शाहू संशोधन केंद्रामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्यासह कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील, डॉ. देविकाराणी पाटील, डॉ. दत्ता मचाले, डॉ. उमाकांत हत्तीकट, डॉ. किशोर खिलारे, अविनाश भाले, सचिन घोरपडे आदी उपस्थित होते.

0 8 MAY 2025

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरच्या पणदूरकर दाम्पत्याचे पुन्हा दातृत्व

## भारतीय संरक्षण निधीसाठी पाच लाखांची देणगी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे माजी भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. राम पणदूरकर व त्यांच्या पत्नी हेमकिरण पणदूरकर या दाम्पत्याने भारतीय राष्ट्रीय संरक्षण निधीला (नॅशनल डिफेन्स फंड) पाच लाख रुपयांची देणगी बुधवारी दिली.

पहलगाम भ्याड अतिरेकी हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीत भारतीय लष्कराचे मनोधैर्य व वित्तीय वाढ करून देण्यासाठी त्यांनी पंतप्रधान कार्यालय, दिल्ली यांच्याकडे धनादेश पाठवला आहे.

यापूर्वी पणदूरकर यांनी शिवाजी विद्यापीठात कमवा व शिका योजनेअंतर्गत, गरीब मुलींच्या अभ्यासिकेची सोय करण्यासाठी रुपये ६० लाख रुपयांची देणगी दिली होती. त्यातून त्यांची दिवंगत कन्या डॉ. रूपाली पणदूरकर अभ्यासिका बांधण्यात आली आहे.

त्यानंतर आता अडीच महिन्यांच्या आत या उभयतांनी सैनिकांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी पाच लाख रुपयांची देणगी रूपाली पणदूरकर स्मृतिप्रीत्यर्थ दिली आहे. यापूर्वीही पणदूरकर दाम्पत्याने अनेक सामाजिक संस्थांना कन्येच्या स्मृतिप्रीत्यर्थ देणग्या दिलेल्या आहेत. लहान मुलींसाठीही पोस्टातील सुकन्या समृद्धी योजनेत खाते उघडून दरवर्षी ठरावीक पैसे भरले जातात.



पणदूरकर दाम्पत्याने भारतीय संरक्षण निधीसाठी पाच लाखांची देणगी पाठवली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 MAY 2025
लोकमत

# पणदूरकर दाम्पत्याने संरक्षण निधीसाठी दिले पाच लाख

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे माजी भूगोल विभागप्रमुख डॉ. राम पणदूरकर आणि हेमकिरण पणूदरकर यांनी भारतीय राष्ट्रीय संरक्षण निधीसाठी पाच लाख रुपयांची देणगी दिली. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर लष्कराचे मनोधैर्य वाढविण्यासाठीचा एक भाग म्हणून त्यांनी हा मदतीचा धनादेश दिल्लीला पाठविला.

हा दहशतवादी हल्ला झाल्यानंतर कशा प्रकारे आपण भारतीय लष्कराला मदत करू शकतो, याचा विचार पणदूरकर दाम्पत्याने केला आणि त्यानंतर त्यांनी राष्ट्रीय संरक्षण निधीसाठी हा निधी देण्याचा निर्णय घेतला. याआधीही दाम्पत्याने शिवाजी विद्यापीठातील कमवा आणि शिका योजनेंतर्गत गरीब मुलींच्या अभ्यासिकेसाठी तब्बल ६० लाखांची देणगी दिली होती. त्यातून त्यांची दिवंगत कन्या डॉ. रूपाली पणदूरकर हिच्या नावे ही अभ्यासिका उभारली. यापूर्वीही पणदूरकर दाम्पत्याने कन्येच्या स्मृतिप्रीत्यर्थ अनेक सामाजिक संस्थांना देणग्या दिल्या असून, लहान मुलींसाठी पोस्टातील सुकन्या समृद्धी योजनेतही खाती उघडली आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 MAY 2025
सकाळ

# महावीर अध्यासनाला एक लाखाचे अक्षयदान



सुरेश रोटे

कोल्हापूर : भगवान महावीर अध्यासनाच्या नूतन इमारत बांधकामासाठी दिगंबर जैन बोर्डिंगचे सुरेश रोटे यांनी एक लाख रुपयाची देणगी अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर दिली. तसेच आनंद यात्री ग्रुपचे आप्पासाहेब इनामदार यांनी देखील अक्षयदान भगवान महावीर अध्यासनास दिले. या देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांनी अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 MAY 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात परीक्षा केंद्रावरून मोबाईल लंपास

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील परीक्षा केंद्राच्या बाहेर ठेवलेल्या बॅगेतील मोबाईल चोरट्यांनी लंपास करण्याची घटना घडली. याप्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. एमएस्सी फिजिक्स विषयाची परीक्षा देण्यासाठी शिवाजी विद्यापीठामध्ये राजवर्धन शिवाजी करले (वय २४, रा. तटाकडील तालीम, शिवाजी रोड) व त्याचा मित्र ऋषीकेश प्रवीण पाटील आले होते. फिजिक्स विभागामध्ये परीक्षा केंद्रात जाताना त्यांनी आपले मोबाईल व इतर साहित्य असणारी बॅग परीक्षा केंद्रावर ठेवली होती. परीक्षा संपल्यानंतर बाहेर येऊन बॅगमधील मोबाईल काढण्याचा प्रयत्न केला असता बॅगमध्ये मोबाईल नसल्याचे त्यांना दिसून आले. याप्रकरणी राजवर्धन करले यांनी राजारामपुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.